महाअधिवक्ता यांचे कार्यालय,
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र.- २२६२३७७९

ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

# निविदा नमुना

दिनांक :

प्रति,
अधिक्षक.
मा. महाअधिवक्ता यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य,
उच्च न्यायालय, मुंबई 400032.

विषय :- महाअधिवक्ता कार्यालयातील निर्लेखित केलेल्या वाहनाची विक्री करणेबाबत.

संदर्भ :- महाअधिवक्ता कार्यालयाची समक्रमांकाची दिनांक १८, जून, २०२६ ची निविदा सूचना

महोदय,

| अ.क्र. | निविदा क्रमांक | (कार्यालयासाठी राखीव) |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता. दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४ | जी. एस. टी. क्रमांक | |
| ५ | निविदा नमुना शुल्क रुपये 500/- भरलेली पावती व क्रमांक व दिनांक | |
| ६ | निविदेसोबत रु. 5000/-अनामत रकमेचा ड्राफ्ट (बँकेचे नाव व क्रमांक) | |
| ७ | निविदा सादर करावयाचा दिनांक | दिनांक १८/०६/२०२६ ते वि. ०४/०७/२०२६ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.30 ते 4.30 पर्यंत |
| ८ | निविदा उघडण्याचा दिनांक | निविदाधारकांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९
**ईमेल-** advocategeneral.mah@gmail.com

महाअधिवक्ता कार्यालयातील निर्लेखित केलेले वाहन क्र. "MH-01-AN-501 (Toyota wola (Petrol))" ची विक्री करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक १८ जून, २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली निविदा नमुना व त्यासोबत जोडलेल्या अटी शर्ती व सूचनांनुसार आम्ही वाहन क्र. "MH-01-AN-501 (Toyota Corola (Petrol))" हे रुपये /- (अक्षरी रुपये फक्त) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छितो.

रुपये मी/आम्ही महाअधिवक्ता कार्यालयामार्फत विक्री करण्यात यावयाच्या वाहनाची पाहणी केली आहे. या प्रक्रियेकरीता विहित केलेल्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

आपला,
निविदा सादर करणाऱ्याचे / संस्थेचे नाव / शिक्का

सोबत :- निर्लेखित साहित्य/वस्तू विक्री करण्यासंदर्भात नियम, अटी व शर्ती.
टिप :- सदर निविदेसाठी आपली निवड झाल्यास कार्यालयीन कामकाजाच्या 5 दिवसाच्या आत महाअधिवक्ता यांचे कार्यालय, म. रा., उच्च न्यायालय, मुंबई 400032 येथे देकाराची रक्कम भरावी व वाहनाचा ताबा घ्यावा...

**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९ फोर्ट, मुंबई-४०० ०३२. ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

## महाअधिवक्ता कार्यालयातील निर्लेखित वाहनाच्या विक्रीबाबत नियम, अटी व शर्ती.

1. महाअधिवक्ता कार्यालयातील निर्लेखित केलेले वाहन क्र. "MH-01-AN-501 (Toyota Corola (Petrol))" हे निविदा पध्दतीने "जेथे आहे व जसे आहे तसे" या तत्वातवर विक्री करणे आहे.

2. उपरोक्त वाहन उच्च न्यायालय आवार, उच्च न्यायालय, मुंबई येथे पाहणीसाठी इच्छुक खरेदीदारांना पाहता येईल.

3. निविदा नमुना अर्जाची किंमत रुपये 500/- आहे. ज्या इच्छूक खरेदीदारास सदर वाहन खरेदी करावयाचे आहे त्यांनी अधिक्षक, मा. महाअधिवक्ता यांचे कार्यालय, म. रा., उच्च न्यायालय, मुंबई - 400032, यांच्याकडे दिनांक १८/०६/२०२६ ते दि. ०४/०७/२०२६ या कालावधीत सकाळी 10.30 ते 4.30 या वेळेत रुपये 500/- (ना-परतावा) धनाकर्षाने/रोख रक्कम भरणा करुन त्यांचेकडून रकमेची पावती व निविदा नमुना अर्ज प्राप्त करावा.

4. इच्छूक खरेदीदाराने खरेदी करावयाच्या वाहनाच्या खरेदीचा दर (देकार) विहित निविदा नमुन्यामध्ये सुस्पष्ट नमूद करुन "Superintendent, Advocate General, M. S., High Court, Mumbai" यांच्या नावे रुपये 5000/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) च्या अनामत रकमेच्या डिमांड ड्राफ्टसह सिलबंद लिफाफ्यात दिनांक १८/०६/२०२६ ते दि. ०४/०७/२०२६ या कालावधीत सकाळी 10.30 ते 4.30 या वेळेत अधिक्षक, मा. महाअधिवक्ता यांचे कार्यालय, म. रा., उच्च न्यायालय, मुंबई- 400 032 या कार्यालयात समक्ष सादर करावेत. निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दिनांक ०४/०७/२०२६ दुपारी 4.30 वाजेपर्यंत राहील. दिनांक ०४/०७/२०२६ नंतर विहित वेळेतर सादर केलेल्या व पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. यास्तव, आपली निविदा वरील कार्यालयात अंतिम दिनांकापूर्वी व वेळेत पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. याबाबत कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

5. सदर विक्री ही निविदा पध्दतीने करण्यात येणार असल्याने निविदेच्या बंद लिफाफ्यावर "निर्लेखित वाहनाच्या खरेदीसाठी निविदा" असे स्पष्ट नमूद करुन मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावे निविदा सादर करण्यात यावी. निविदाधारकाने निविदा अर्जासोबत उपरोक्त अ.क्र.3 व 4 येथे नमूद केलेली निविदा नमुना अर्जाचे शुल्क भरल्याची मूळ पावती/ऑन लाईन भरणा केल्याची पावती व अनामात रकमेचा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

6. निविदाधारकाकडून निविदा सादर करताना पॅनकार्ड/आधारकार्ड यांची प्रत जोडण्यात यावी. अन्यथा निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९ फोर्ट, मुंबई-४०० ०३२. ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

7. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ निविदाधारकांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. निविदा उघडण्याच्या विहित दिनांकास व वेळेस संबंधित निविदाधारकास किंवा त्याच्या प्रतिनिधीस व्यक्तीश: उपस्थित राहता येईल. संबंधित निविदाधारक अनुपस्थित राहिल्यास सदर निविदा उपस्थित निविदाधारक/प्रतिनिधींसमोर उघडण्यात येईल. कोणताही निविदाधारक उपस्थित न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थित निविदा उघडण्यात येतील. याबाबत अनुपस्थित निविदाधारकांची कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

8. सर्वात जास्त रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास सदर निविदा प्रकीयेमध्ये "यशस्वी निविदाधारक" म्हणून घोषित करण्यात येईल.

9. यशस्वी निविदाधारकाने मंजूर निविदा रकमेतून अनामत रक्कम वजा जाता उर्वरित रकमेचा कार्यालयीन कामकाजाच्या 5 दिवसात "अधिक्षक, मा. महाअधिवक्ता यांचे कार्यालय, म. रा., उच्च न्यायालय, मुंबई-400 032", यांच्याकडे रोख किंवा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरणा करणे आवश्यक राहील. अन्यथा, त्याची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व उपरोक्त अ. क्र. 8 मध्ये नमूद केलेल्या निवड प्रक्रियेतील द्वितीय क्रमांकाच्या निविदाधारकास यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल.

10. वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) भरावा लागेल. तसेच वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल.

11. दरामध्ये तसेच निविदा कागदापत्रात कोठेही खाडाखोड, overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसेच करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

12. शासकीय वाहन क्रमांक "MH-01-AN-501 (Toyota Corola (Petrol))", या वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल.

13. यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या 5 दिवसात सदर वाहन आहे त्या ठिकाणावरुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी महाअधिवक्ता कार्यालयामार्फत कोणतेही मनुष्यबळ किंवा इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच, निविदा मंजूरीनंतर सदर वाहन वाहतूक करताना ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क/कराचा भरणा किंवा अनुषंगिक खर्चाची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९ फोर्ट, मुंबई-४०० ०३२. ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

14. यशस्वी निविदाधारकाने निविदा मंजुरीनंतर कोणत्याही कारणास्तव वाहन ताब्यात घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत संबंधित निविदाधारकास परत करण्यात येणार नाही.

15. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट/शर्त स्विकारली जाणार नाही.

16. कोणतेही कारण न देता निविदा प्रकीया कोणत्याही टप्प्यावर थांबविणे किंवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. महाअधिवक्ता, म. रा., उच्च न्यायालय, मुंबई 400032 यांनी राखून ठेवले आहेत.

| अ.क्र | निविदा प्रक्रीया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द झाल्याचा दिनांक | दि. १८ जून, २०२६ |
| २ | निविदा नमुना अर्ज मिळण्याचा कालावधी (कार्यालयीन दिवशी) | दि. १८/०६/२०२६ ते ०४/०७/२०२६ सकाळी 10.30 ते 4.30 |
| ३ | निविदा सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन दिवशी) | दि. १८/०६/२०२६ ते ०४/०७/२०२६ सकाळी 10.30 ते 4.30 |
| ४ | निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. ०४/०७/२०२६ दुपारी 4.30 पर्यंत |
| ५ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | निविदाधारकांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. |

**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९ फोर्ट, मुंबई-४०० ०३२. ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

**महाराष्ट्र शासन**

मा. महाअधिवक्ता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई 400032.

1. वाहन निर्लेखन आदेश क्र: वाहन / 563/2023. दिनांक 04 सप्टेंबर, 2023

2. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक: ०४ जुलै, २०२६

| अ.क्र. | विक्री करावयाच्या निर्लेखित वाहनाचा तपशिल | |
|---|---|---|
| १ | वाहन खरेदीचा दिनांक | २५ AUGUST, २०१२ |
| २ | रजिस्ट्रेशन क्रमांक व दिनांक | MH-०१-AN-५०१ |
| ३ | चेसीस क्रमांक | MBJ५३REE२०४६०३४९८ |
| ४ | इंजिन क्रमांक | २ZR१०३६०५९ |
| ५ | उत्पादक कंपनी | TOYOTA |
| ६ | वाहनाचा प्रकार | COROLLA ALTIS १.८J |

**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९
ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

# Advocate General of Maharashtra, M.S., High Court, Mumbai.

## Title of Tender

Tender Notice for the sale of Write Off Vehicle No. MH-01-AN-501 in Advocate General of Maharashtra, M. S., High Court, Mumbai

# महाअधिवक्ता यांचे कार्यालय, म. शा., उच्च न्यायालय, मुंबई

## निविदेचे शिर्षक

महाअधिवक्ता कार्यालयातील निर्लेखित वाहन क्र. एमएच-01-एएन-501 ची विक्री करण्यासाठी निविदा सूचना.